**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.३१०/२०२१</u>**
**<u>(लालासो वि. आनंदा)</u>**
**<u>(CNR No.MHSN12001337-2021)</u>**

## <u>निशाणी क्र.२७ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल करण्यात आला आहे. वादीने असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रतिवादी नं. 1 ते 3 यांचेविरूध्द प्रस्तुतचा दावा, डिक्लेरेशनकरीता व निरंतर मनाईकरीता दावा दाखल केला आहे. याकामी यापुर्वी प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या दाव्यामध्ये प्रतिवादी नं. ४ म्हणून महाराष्ट्र सरकार तर्फे जिल्हाधिकारी, प्रतिवादी नं. ५ म्हणून मे. तहसिलदार, पलूस, व प्रतिवादी नं. ६ म्हणून मे. मंडल अधिकारी पलूस यांना पक्षकार केले होते. तदनंतर काही तांत्रिक कारणांमुळे दावा दुरूस्ती करण्यात येवून प्रतिवादी नं. ४ ते ६ यांना प्रस्तुतच्या दावा कामातून वगळण्यात येवून त्यांचेविरूध्द मागणी केलेल्या दादी देखील वगळण्यात आलेल्या आहेत. तशी दुरूस्ती मे. न्यायालयाने मंजूर केली व तशी दुरूस्त दाव्यामध्ये यापुर्वीच करण्यात आलेली आहे. त्यांनी असेही कथन केले आहे की, मुळ दावा अर्जातील पॅरा नं. ३ मध्ये ज्या ज्या ठिकाणी प्रतिवादी नं.६ असा उल्लेख आहे. त्या त्या ठिकाणी मा. मंडल अधिकारी पलूस असा मजकुर नमूद करण्यास परवानगी असावी. तसेच मुळ दावा अर्जातील पॅरा नं. ४ मध्ये ज्या ज्या ठिकाणी प्रतिवादी नं. ५ व ६ असा उल्लेख आहे. त्या त्या ठिकाणी मे. तहसिलदार पलूस व मा. मंडल अधिकारी पलूस असा मजकुर तसेच ज्या ठिकाणी प्रतिवादी नं. ६ असा मजकुर नमूद आहे त्या ठिकाणी मा. मंडल अधिकारी पलूस असा मजकुर नमूद करण्यास परवानगी असावी. तसेच मुळ दावा अर्जातील पॅरा नं. ५ 5 मध्ये ज्या ज्या ठिकाणी प्रतिवादी नं. ६ असा उल्लेख आहे. त्या त्या ठिकाणी मा. मंडल अधिकारी पलूस असा मजकुर नमूद करण्यास परवानगी असावी. तसेच ज्या ज्या ठिकाणी प्रतिवादी नं. ५ असा मजकुर नमूद आहे त्या ठिकाणी मे. तहसिलदार पलूस व प्रतिवादी नं. ४ असा मजकुर नमूद नमूद आहे त्या ठिकाणी महाराष्ट्र सरकार तर्फे मा. जिल्हाधिकारी सांगली असा मजकुर नमूद करण्यास परवानगी असावी. तसेच मुळ दावा अर्जातील पॅरा नं. ६ मध्ये ज्या ज्या ठिकाणी प्रतिवादी नं. ६ असा उल्लेख आहे. त्या त्या ठिकाणी मा. मंडल अधिकारी पलूस असा मजकुर नमूद

करण्यास परवानगी असावी. तसेच ज्या ठिकाणी प्रतिवादी नं. १ ते ६ असा मजकुर नमूद आहे त्या ठिकाणी महाराष्ट्र सरकार तर्फे मा. जिल्हाधिकारी सांगली, मे. तहसिलदार पलूस व मा. मंडल अधिकारी पलूस असा मजकुर नमूद करण्यास परवानगी असावी. तसेच मुळ दाव्यातील पॅरा नं. ७ मधील नमूद संपुर्ण मजकुर वगण्यास परवानगी असावी. मुळ दाव्यातील पॅरा नं. ८ मध्ये शेवटून चौथी ओळीमधील नमूद वादी यांनी प्रतिवादी नं. ५ व ६ यांचे विरूध्द या वाक्यास काट देण्यात येवून तसा मजकुर वगळण्यास परवानगी असावी. तसेच मुळ दाव्यातील पॅरा कलम १० ब) मध्ये प्रतिवादी नं. ६ असा नमूद केलेला मजकुर वगळण्यात येवून त्या ठिकाणी मा. मंडल अधिकारी पलूस असा मजकुर नमूद करण्यास परवानगी असावी. वर कलम २ ते ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुळ दावा अर्जामध्ये दुरूस्ती होणे अनिवार्य झाले आहे. सदरची दुरूस्ती ही आवश्यक स्वरूपाची असल्याने व दावाकामी होणाऱ्या हुकुमनाम्याची अंमलबजावणी सोईस्करपणे होवून मिळण्याकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करुन प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी सदरच्या अर्जास म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास हरकत घेतली असून सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. दाव्याचे, अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द जाहीर उदघोषणेसाठी व निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे. जरी सदरच्या अर्जास प्रतिवादीने हरकत घेतली असली तरीही वादीने मागणी केलेली दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच, अर्जामध्ये नमुद प्रस्तावित दुरुस्ती या दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटना असल्याने सदरची दुरुस्ती मान्य करणे न्यायोचित होईल, त्यामुळे प्रतिवादीस कोणतेही नुकसान होणार नाही. करिता सदरचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त होईल त्यामुळे मी सदरचा अर्ज मंजूर करुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. **निशाणी क्र.२७** कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्त करुन दुरुस्त वादपत्र पुढील तारखेपर्यंत पटलावर सादर करावे.

३. दोन्ही पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

SHAIKH MOHAMMED AAMER

Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2025.07.16 16:28:18 +0530

**ठिकाण- पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दिनांक- १५.०७.२०२५.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पलूस.**

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou. J. A. Salunkhe (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 15.07.2025 |
| Order signed by the Presiding officer on | : | 15.07.2025 |
| Order uploaded on | : | 16.07.2025 |